महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २६/०२/२०१४

## वीजकंपन्यांचे श्रेय लाटण्याचा आप पक्षाचा प्रयत्न
## वीज कंपन्यांचा आरोप

आम आदमी पक्षाने आज दिनांक २६ फेब्रुवारी २०१४ रोजी महानिर्मितीवर केलेले आरोप पूर्णत: चुकीचे असून केवळ श्रेय लाटण्यासाठी राजकीय हेतूने प्रेरित असलेले आहेत, असे महानिर्मितीतर्फे स्पष्ट करण्यात येत आहे.

कोल वॉशरीज् संदर्भात पोलिसात गुन्हा नोंदविणे, स्पर्धात्मक आयोगाकडे (CCI) दाद मागणे यासंदर्भात महानिर्मिती कंपनीने केलेल्या कामांचे श्रेय लाटण्याचा उद्योग आज आप पक्षाने केला, कारण कोल वॉशरीज् संदर्भातील प्रकरण नागपूर उच्च न्यायालयात गेल्या काही वर्षांपासून सुरु होते. हे प्रकरण उच्च न्यायालयाने दि. १७ जानेवारी २०१४ रोजी खारिज केले. त्यानंतर दि. २१ फेब्रुवारी २०१४ रोजी सर्व संबंधित कोल वॉशरीजधारकांवर नागपूर पोलिसात तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. ही पार्श्वभूमी लक्षात न घेता महानिर्मितीने ही तक्रार आमच्यामुळे दाखल केलेली आहे, हा आप पक्षाचा दावा पूर्णत: हास्यास्पद आहे.

स्पर्धात्मक आयोगाबद्दल आज आप पक्षाने पुन्हा एकदा कोणताही अभ्यास न करता चुकीची माहिती देऊन दिशाभूल केलेली आहे, कारण एकतर्फी इंधन करार व त्या अनुषंगाने कोळशाची गुणवत्ता व प्रमाण याबाबत मे. कोल इंडिया लि. यांचेविरुध्द याचिका दाखल करणारी महानिर्मिती ही देशातील पहिलीच वीजनिर्मिती कंपनी आहे. (संबंधित पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.) नंतर देशातील इतर वीज कंपन्यांनी महानिर्मितीचे अनुकरण करुन स्पर्धा आयोगाकडे तक्रार दाखल केलेल्या आहेत. स्पर्धा आयोगाने महानिर्मितीने केलेल्या दाव्याच्या अनुषंगाने वस्तुस्थिती तपासून कोळसा कंपन्यांना १७७३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे, हे श्रेय निश्चितच महानिर्मितीचे आहे.

**********